नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
शाखा कार्यालय, वर्धा

PH. ०७१५२-२४२६३९
E-Mail. townplanner1wardha@rediffmail.com

जिल्हा क्रीडा संकुल, डॉ. आंबेडकर चौक,
सिव्हील लाईस्, वर्धा-४४२००१

जा.क्र.अकृषक/मौजा.शेकापुर/ता.कारंजा(घा)/स.क्रं.३४/१/नरव/२०३८ दिनांक :- २४/१०/२०१६

प्रति,
तहसिलदार,
कारंजा(घा) .

विषय : मौजा- शेकापुर तह.कारंजा(घा) येथिल शेत सर्व्हे क्र.३४/१ आराजी १.१९ हे.आर अभिन्यास अंतीम मंजुरीस्तव पाठविण्याबाबत.

संदर्भ :.१) या कार्यालयाचे पत्र क्र.अकृषी/मौजा शेकापुर/ता.कारंजा(घा) /स.नं.३४/१/नरव-८५८ दि.०३/०५/२०१६
२) आपले पत्र क्र.कलि/प्रस्तु-१/कावि-१२५८/२०१६, दि. १३/०८/२०१६.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये विषयांकीत अभिन्यास नकाशास सिमांकनाची शिफारस केलेली आहे. आता संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये सिमांकित अभिन्यास नकाशे व सिमांकित मोजणी नकाशा क प्रत (मो.र.क्र. ५९/२०१६ दि. १४/०७/२०१६ सोबत सादर करुन, या कार्यालयाचा अभिप्राय अपेक्षिलेला आहे.त्या बाबत खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

शासनाचे दि. १०/०२/२०१० चे निर्देशानुसार विषयांकित जागेचे जमीन धारकांनी अभिन्यास छाननी शुल्क रु. १५००/-(अक्षरी रु. एक हजार पाचशे रुपये फक्त) शासकिय खजिन्यात चलान क्र.५३०१२०, दि.३१/०३/२०१६ रोजी जमा केले आहे.

प्रकरणात सादर अभिन्यास नकाशाची छाननी केली असता सादर केलेले सिमांकित अभिन्यास नकाशे या कार्यालयाने संदर्भित पत्र क्रं.१ अन्वये आखणीची शिफारस केल्यानुसार असल्यामुळे उक्त सिमांकीत अभिन्यासात खालील अटीवर मंजुरीची शिफारस (Recommended for Approval) करण्यांत येत आहे.

१) शासनाकडील निर्देशांचे अनुंषगाने प्रचलीत नियमावली तरतुदी नुसार विकास शुल्काचा भरणा संबधित नियोजन प्राधिकरणाकडे करणे अर्जदारास/विकासकास बंधनकारक राहील.
२) उक्त अभिन्यासातील रस्याचे खडीकरण, नालीचे बांधकाम व इतर विकास योग्य प्रकारे झाला असल्याबाबतची खात्री आपल्या स्तरावरुन करुन घ्यावी. त्यानंतरच अंतिम आदेश पारीत करण्यात यावा.
३) अभिन्यासातील खुली जागा, रस्ते या व्यतीरीक्त इतर सर्व भुखंडाचा उपयोग रहिवास प्रयोजनार्थ करण्यात यावा.
४) अभिन्यासातील खुली जागा, रस्ते इत्यादी विकसीत करुन स्थानिक प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
५) "अर्जदार/जमीन मालक यांनी स्वखर्चाने भूखंडधारकांना पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करावी."
६) अभिन्यासातील भूखंडावरुन विद्यृत दाब वाहिनी गेली असल्यास आवेदकाने /विकासकाने स्वखर्चाने रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत करावी.

Scanned with CamScanner

७) अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक/विकास यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

८) सदर जागेवर पिण्याचे पाण्याची उपलब्धता असल्याबाबत संबंधीत विभागाचे प्रमाण पत्र घेणे आवश्यक राहील.

९) अभिन्यासातील भूखंडात बांधकाम करतांना क्षेत्राकरीता लागू असणाऱ्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियम लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमाचे पालन करावे. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.

१०) सदर जागेतील वृक्षांचे संरक्षण करुन प्रत्येक भुखंड धारकाने वृक्षाचे संवर्धन करावे.

११) अभिन्यासातील पोच रस्ते, अंतर्गत रस्ते, नाली, पाण्याची व्यवस्था, कर्ब्हेट, पुल, रस्त्याचे बाजूस

१२) विजेचे पोल व इतर आवश्यक सार्वजनिक सुविधा विकसीत करणे आवेदकावर बंधनकारक राहील. तसेच

१३) अभिन्यासातील सदर विकास कामे पुर्ण करुन ती संबधीत स्थानिक/नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

१४) अभिन्यसातील खुल्या जागेबाबत महाराष्ट्रातील नगर परीषद व नगर पंचायतीकरीता लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार हमीपत्र /बंधपत्र आवेदकाकडून घेणे आवश्यक राहील.

१५) सदर शिफारस ही आवेदकाच्या मालकीच्या जागेपूरतीच मर्यादीत असून, आवेदकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेचा विकास करण्याकरीता ही शिफारस लागू होणार नाही.

१६) पावसाचे पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१७) विषयांकित जागेच्या अभिन्यासामधील भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी अर्जदारास बांधकाम नकाशे स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

१८) भविष्य काळात अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन करु नये.

१९) महाराष्ट्र लँड रेव्हेन्यु रुल्स १९६९, (जमिनीच्या वापरातील बदल व अकृषीक कर आकारणी) च्या कलम ४ च्या अटीचे पालन करावे.

२०) दक्षिणेकडील काही भुखंडांचे दक्षिण हद्दीतुन जानारी विद्यृत वाहीनी स्थलांतरीत करणे बंधनकारक राहील.

२१) जागेचे मालकी हक्क, अभिन्यासाच्या हद्दी व क्षेत्रफळाबाबत तसेच पोचरस्त्याबाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात यावी.

२२) वरीलअटींची पुर्तता होताना अभिन्यासात फेरबदल झाल्यास सुधारीत अभिन्यासास मंजुरी प्राप्त करुन घ्यावी लागेल.

मंजुरीची शिफारस (Recommended for Approval) केलेल्या अभिन्यासाची दोन प्रती या सोबत सादर करीत आहे.

सहपत्र: वरीलप्रमाणे

(सु.वे.देशमुख)
नगर रचनाकार
नगर रचना,शाखा कार्यालय,वर्धा

प्रत :- सचिव,ग्रामपंचायत, दाभा, ता.कारंजा(घा) यांना माहितीस्त.

34/1.

Scanned with CamScanner